फुलशेती

# मोगरावर्गीय फुलझाडांची लागवड लाभदायी




**प्रा. भूषण तायडे**
(मो.नं. ९७६६८०८३२४)
क.का. वाघ उद्यानविद्या
महाविद्यालय, नाशिक




मोगरावर्गीय फुलझाडांमध्ये मोगरा, जाई-जुई, चमेली, सायली, नेवाळी, कागडा इत्यादी फुलांचा समावेश होतो. मोगरावर्गीय फुलझाडांच्या कळ्यांना गजरा, हार-गुच्छ यांसाठी भरपूर मागणी असते. या वर्गातील फुलझाडांचे दुसरे वैशिष्ट्य असे की, यातील कोणता न कोणता प्रकार वर्षातील बाराही महिने फुलत असतो.

**प्रा**चीन काळापासून मोगरावर्गीय फुलझाडांची लागवड केली जाते. मोगरावर्गीय फुलांना देवपूजेसाठी आणि गजरे तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मागणी असते. सार्वजनिक उद्यानामध्ये शोभा वाढविण्यासाठी या फुलझाडांची लागवड केली जाते. मंदिराभोवती मोगरावर्गीय फुलझाडे लावण्याची प्रथा बरीच जुनी आहे.

मोगरावर्गीय फुलांना परदेशात, प्रामुख्याने आखाती देशात भरपूर मागणी आहे. फ्रान्समध्ये या फुलांपासून मोठ्या प्रमाणावर सुगंधी द्रव्ये तयार करतात. या सुगंधी द्रव्यांचा उपयोग अत्तरे, विविध प्रकारची तेले, सौंदर्य प्रसाधने, साबण, लिपस्टिक इत्यादी बनविण्यासाठी होतो.

मोगरावर्गीय फुलझाडांमध्ये मोगरा, जाई-जुई, चमेली, सायली, नेवाळी, कागडा इत्यादी फुलांचा समावेश होतो. मोगरावर्गीय फुलझाडांच्या कळ्यांना गजरा, हार-गुच्छ यांसाठी भरपूर मागणी असते. या वर्गातील फुलझाडांचे दुसरे वैशिष्ट्य असे की, यातील कोणता न कोणता प्रकार वर्षातील बाराही महिने फुलत असतो.

**उन्हाळा :** मोगरा

**हिवाळा :** कागडा, नेवाळी, सायली

**पावसाळा :** जाई, जुई

या प्रकारातील फुलांचा अर्क काढून त्यापासून वेगवेगळी सुगंधी तेले आणि अत्तरे बनवितात. ही अत्तरे महाग असतात आणि त्यांना परदेशात भरपूर मागणी असते. पद्धतशीर नियोजन करून या वर्गातील फुलझाडांची लागवड केल्यास वर्षभर नियमितपणे फुलांचे उत्पादन मिळविण्याचे हे चांगले साधन आहे.

**हवामान :** मोगरा, जाई- जुई, चमेली या फुलांच्या लागवड पद्धतीत बरेच साम्य आहे. ज्या प्रदेशात उन्हाळा अधिक आणि हिवाळा सौम्य असतो अशा प्रदेशात मोगरावर्गीय फुलझाडे चांगली बहरतात. सर्वसाधारणपणे मोगरावर्गीय फुलझाडे हवामानाच्यादृष्टीने अत्यंत काटक आहेत. उष्ण व कोरडे हवामान, स्वच्छ सूर्यप्रकाश, मध्यम स्वरुपाचा पाऊस या पिकाला अतिशय अनुकूल आहे. अति थंडी, धुके आणि दव यामुळे पिकांच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होतो. सुगंधी अर्कासाठी फुलझाडांची लागवड फुलांचा बहर मध्यम हिवाळा आणि सौम्य उन्हाळा असताना, म्हणजेच साधारणपणे फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात येईल अशा प्रकारे करावी.

**जमीन :** मोगरावर्गीय फुलझाडांच्या लागवडीसाठी हलकी ते मध्यम काळी व जमिनीचा सामू ६.५ ते ७.० असलेली, पाण्याचा उत्तम निचरा होणारी भारी जमीन योग्य आहे. दलदलीची किंवा पाणथळ भरपूर खोलोची चुनखडीची जमीन निवडू नये.

**जातींची ओळख**

**मोगरा :** मोगरा हे फुलझाड झुडुपाप्रमाणे वाढणारे असून



९० ते १०० सें.मी. उंच वाढते. मोगऱ्याला उन्हाळी व पावसाळी अशा दोन्ही हंगामांत फुलांचा बहर येतो. उन्हाळ्यात मार्च-एप्रिल आणि मे या महिन्यांत फुलांचा हंगाम असतो. फुले पांढरीशुभ्र किंवा दुहेरी पाकळीची असतात.

**जाती :** मदनबाण, सिंगल मोगरा, डबल मोगरा, रामबाण गुडूमुळी, सुजीमुल्ली, मोतिया खोया.

**जाई :** जाईची झाडे वेलीप्रमाणे वाढतात. झाडांच्या फांद्या खोडापासून निघून शेंड्याकडील भाग लोंबकळत राहतो. फुलांच्या पाकळ्या या जातीतील इतर प्रकारांच्या तुलनेत मोठ्या असतात. जाईचा देठ जांभळट आणि पाकळ्या पांढऱ्या रंगाची असतात. ती सुगंधी द्रव्ये काढण्यासाठी उत्तम समजली जातात.

**जुई :** जुई प्रकारातील झाडे वेलीप्रमाणे वाढतात. मुख्य खोडाभोवती अनेक धुमारे येत राहतात. जुईची पाने लहान असून, एका देठावर तीन पानांचा समूह असतो. जुईची फुले लहान आकाराची, पांढऱ्या शुभ्र रंगाची, नाजूक पाकळीची असून ती झुपक्यात येतात. जुईच्या फुलांचा उपयोग गजरे करण्यासाठी आणि सुगंधी द्रव्ये बनविण्यासाठी केला जातो.



**जाती** : लाँग पॉईंट राऊंड, लाँग पॉईंट, ओवाल शॉर्ट पॉईंट.

**पिवळी जाई** : या वेलीला सुवर्णवेल असेही म्हटले जाते. या वेलीच्या एका देठावर १ ते ३ पानांचा समूह असतो. या वेलीची फुले लहान आकाराची, पाच पाकळ्यांची आणि सोनेरी पिवळ्या रंगाची असून त्यांना मंद वास असतो. वेलींना हिवाळी हंगामात फुले येतात.

**कुंदा** : कुंदाचे झाड लहान झुडुपाच्या स्वरुपात वाढते. पानाच्या खालच्या बाजूस केसाळ लव असते. कुंदाच्या झाडाला वर्षभर फुले येतात. मात्र फुले हिवाळ्यात जास्त येतात. कळी अवस्थेत फुले लालसर, जांभळट रंगाची असतात. पूर्ण उमललेल्या फुलांच्या पाकळ्या वरच्या बाजूस पांढऱ्या तर खालच्या बाजूस जांभळट गुलाबी रंगाच्या असतात.

**कागडा** : कागड्याची झाडे झुडुपासारखी अथवा वेलीसारखी वाढतात. वेलींना हिवाळ्यात फुले येतात. फुले पांढऱ्या रंगाच्या झुपक्यात येतात.

**सायली** : सायलीची झाडे वेलीसारखी वाढतात. हिवाळ्यात फुले येतात, फुले चांदणीच्या आकाराची आणि पांढऱ्या शुभ्र रंगाची असतात.

**अभिवृद्धी** : मोगरावर्गीय फुलझाडांची अभिवृद्धी फाटे कलमाने करतात. फाटे कलमासाठी निवडलेली फांदी जोमदार वाढीची, पूर्ण पक्व आणि पेन्सिलच्या जाडीची असावी. निवडलेल्या फांदीवरील मध्य भागातील ४ ते ५ डोळे असलेले, १८ ते २० सें.मी. लांबीचे तुकडे फाटे कलमासाठी वापरावेत.

मोगरावर्गीय फुलझाडे बहुवर्षीय असून एकदा लागवड केल्यानंतर त्याच जागी ८ ते १० वर्षे राहतात.

| फुलझाडे | लागवडीचे अंतर | झाडांची संख्या |
|---|---|---|
| मोगरा | भारी जमीन १.२०x१.२० मी. | ६९४४ |
| | मध्यम १x१ मी. | १०००० |
| | हलकी ०.७५x०.७५ मी. | १७७७७ |
| जाई, जुई | भारी जमीन २.५x२.५ मी. | १६०० |
| | मध्यम २x१.५ मी. | ३३३३ |
| | हलकी १.८x१.८ मी. | ३०८६ |
| चमेली | २x२ मी. | २५०० |
| कुंदा | १.८x१.८ मी. | ३०८६ |

**छाटणी पद्धत** : मोगरावर्गीय फुलझाडांची व्यापारी लागवड जास्त फायदेशीर होण्यासाठी वेलीवर नवीन फुटीचे प्रमाण जास्त असणे आवश्यक आहे. नवीन फुटीचे प्रमाण जास्त असल्यास फुले जास्त मिळतात. नवीन फुटी घेण्यासाठी वेलीच्या झुडुपांची हलकी ते मध्यम प्रमाणात छाटणी करणे आवश्यक असते. छाटणीची वेळ प्रत्येक जातीसाठी वेगवेगळी असते.

**चमेली:** डिसेंबर, जानेवारी

**जाई, जुई व कुंदा** : नोव्हेंबर

**खते** : काही मोगरावर्गीय फुलझाडे सदाहरित आहेत. काही जातींना एक वेळा किंवा दोन वेळा तर काहींना वर्षभर फुले येतात. तीन वर्षे आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या झाडाला दरवर्षी १० किलो शेणखत, १००:१५०:१०० नत्र, स्फुरद, पालाश तीन समान हप्त्यात विभागून जानेवारी, एप्रिल आणि ऑगस्ट महिन्यात द्यावे.

**आंतरपिके** : मोगरावर्गीय फुलझाडांची लागवड केल्यानंतर त्यामध्ये भुईमूग, श्रावण, घेवडा, पानकोबी, फुलकोबी यासारखी कमी कालावधीत येणारी भाजीपाला पिके घेता येतात.

**फुलांची काढणी** : मोगरावर्गीय फुलझाडांना लागवडीच्या पहिल्या वर्षी काही प्रमाणात फुले येतात व



त्यानंतर पुढील वर्षी फुलांचे उत्पादन वाढते. मार्च ते ऑक्टोबर या कालावधीत फुले येतात.

(वेणी, गजरा यासाठी फुले उमलण्यापूर्वी म्हणजे पूर्ण वाढ झालेल्या कळीच्या अवस्थेत फुलांची तोडणी करावी.)

**उत्पादन** : मोगऱ्याची लागवड केल्यानंतर पहिल्या वर्षापासून फुले येऊ लागतात. पीक तीन वर्षांचे झाल्यानंतर उत्पादन वाढते. मोगऱ्याचे झाड १० ते १२ वर्षे चांगली फुले देते. मोगऱ्याचे दरवर्षी हेक्टरी ८ ते १० टन उत्पादन मिळते. जाई- जुई ३ ते ४ टन उत्पादन देते. एक टन फुलांपासून २.८ ते ३ किलो सुगंधी द्रव्याचा उतारा मिळतो. ■